# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात संशोधन प्रस्ताव लेखन तंत्र राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

महाड

येथील पीपल्स् एज्युकेशन सोसायटी मुंबईच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठी विभाग मुंबई विद्यापीठ व मराठी विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन प्रस्तावाचे लेखन तंत्र या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार दि. २७ एप्रिल रोजी २०१९ रोजी करण्यात आले आहे. संशोधन क्षेत्राचा दर्जा सुधारावा आणि विद्यार्थ्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, संशोधनाची शिस्त काटेकोरपणे अमंलात आणण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या संशोधनात पारदर्शकता निर्माण होण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळेची आवश्यकता असल्याचे मत या कार्यशाळेचे आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेचे उद्घाटन मुंबई विद्यापीठ मराठी विभाग प्रमुख व मराठीतील प्रख्यात लेखक डॉ. अनिल सकपाळ यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यशाळेत संशोधन प्रस्तावाचे लेखन तंत्र, मराठी संशोधनाच्या नव्या दिशा - चर्चा या विषयावर मराठी साहित्यातील ज्येष्ठ अभ्यासक व समिक्षक डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस, डॉ. मनोहर जाधव, डॉ. अरूणा दुभाषी, डॉ. वंदना महाजन, डॉ. निळकंठ शेरे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ग्रामीण भागातील पीएच.डी. एम.फील. करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या कार्यशाळेमुळे निश्चित अशी संशोधनाची दिशा मिळेल. त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण होईल यासाठी या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा जास्तीत-जास्त विद्यार्थी व प्राध्यापक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांनी केले.